# जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव

**सभा क्र. ४४ // स्थायी समिती सभेचे कार्यवृत्त // दिनांक : ०८/०३/२०२१**

जळगांव शहर महानगरपालिकेत दि.०८/०३/२०२१ सोमवार रोजी सकाळी ११.०० वाजता जळगांव शहर महानगरपालिकेच्या सरदार वल्लभभाई पटेल टॉवर प्रशासकीय इमारतीमधील २ ऱ्या मजल्यावरील सभागृहात स्थायी समिती सभापती पाटील राजेंद्र झिपरू यांचे अध्यक्षतेखाली झालेल्या स्थायी समिती सभेचे कार्यवृत्त. खालील मा.सदस्य सभेस उपस्थित होते.

**मा. पाटील राजेंद्र झिपरू सभापती तथा पिठासीन अधिकारी**

| | |
|---|---|
| दारकुंडे नवनाथ विश्वनाथ | बाविस्कर किशोर रमेश |
| सोनवणे मुकुंदा भागवत | पाटील कुलभुषण विरभान |
| देशमुख प्रतिभा गजानन | लढढा नितीन बालमुकुंद |
| काळे रेश्मा कुंदन | बरडे नितीन मनोहर |
| चव्हाण ज्योती बाळासाहेब | नाईक प्रशांत सुरेश |
| नेरकर सरिता अनंत | शेख सैईदा युसुफ |

सदर सभेस मा.आयुक्त, श्री.सतिश कुलकर्णी, नगरसचिव ,श्री.सुनिल गोराणे, उपायुक्त, शाम गोसावी, उपायुक्त,प्रशांत पाटील, मुख्यलेखा परिक्षक, श्री.संतोष वाहुळे, मुख्यलेखाधिकारी, श्री.कपिल पवार, सहा.आयुक्त, श्री.आकाश डोईफोडे व सहा.आयुक्त. श्री.पवन पाटील उपस्थित होते.

**वंदे मातरमने सभेला सुरुवात करण्यात आली.**

**नगरसचिव :-** कोविड-१९ च्या दृष्टीकोनातुन सर्वांनी सोशल डिस्टंसींग ठेवुन बसायचे आहे. आजच्या स्थायी समिती सभेकरीता सन्मा.सदस्य श्री.ललित विजयराव कोल्हे यांचा रजेचा अर्ज आलेला असुन तो मा. सभापती महोदय यांनी मंजूर केलेला आहे. विषयपत्रिकेवरील विषयांना सुरुवात करण्यात येत आहे.

**मा.सभापती :-** आज या महिला दिनानिमित्त मी सभापती या नात्याने सर्व महिला बघिणींना हार्दिक शुभेच्छा देतो. सभा कामकाजाला सुरुवात करण्यात यावी.

**नगरसचिव :- विषय क्र. १:-** जळगांव महानगरपालिका अंतर्गत म.न.पा.चे विविध ठिकाणचे कोविड-१९ साठीचे सी.सी.सी. व क्वॉरटाईन सेंटर येथील शौचालय, मुताऱ्या, रुम पॅसेज, परिसर स्वच्छ करणे व या ठिकाणी औषधी फवारणी करणेकामी दैनंदिन ४५० (आवश्यकतेप्रमाणे) कामगारांचा पुरवठा करणेकामी मे.दिपक उत्तराधी, अमरावती यांना ३ महिन्याची मुदतवाढ देणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

**श्री.नवनाथ दारकुंडे** :- प्रस्ताव मान्य आहे.

**श्री.किशोर बाविस्कर** :- माझे अनुमोदन आहे.

**श्री.कुलभुषण पाटील :-** आयुक्त साहेब व सभापती महोदय, आपण संबंधीत ठेकेदाराला जवळपास वर्ष भरापासुन हे काम दिलेले आहे. परंतु वर्कऑर्डर त्याला ४५० माणसे पुरविण्याची दिलेली आहे. परंतु प्रत्येक्षामध्ये त्या ठिकाणी त्या ठेकेदाराकडुन आता पर्यंत ६० ते ७० लोकांच काम आपण त्यांच्याकडुन करुन घेतो आहे. पण याला कार्यादेश देतांना ४५० माणसांचा कार्यादेश दिलेला आहे लेबरसाठी, जसे आपण वॉटरग्रेससाठी आपण म्हणतो नेहमी की, जर आपण याच काम थांबविले किंवा याच काम खंडीत केले तर हा उद्या न्यायालयात जाईन आणि ती न्यायालयीन बाब होईल आणि आपल्याला आणि सर्व सदस्यांना त्याचा दंड भोगावे लागेल किंवा शिक्षा भोगावी लागेल. तर मला सांगा.

**स्थायी समितीची सभा सुरु असतांना सभागृहात मोकाट कुत्र्यांबाबत निवेदन देण्यासाठी नागरीक आले व सोबत कुत्रे घेऊन आले.**

**श्रीमती सरिता माळी :-** आज आम्हाला येथे अश्या पध्दतीने यावे लागले, पण माणसांची भाषा समजत नाही म्हणुन आम्ही कुत्र्यांची भाषेत निवेदन द्यायला आलेलो आहोत. हे तुम्ही लोकमतचा पेपर वाचा आणि सिव्हील हॉस्पीटलचा रेशो काढा. हे पिसाटलेले कुत्रे, रॅबीज झालेले कुत्रे, किती लोकांचा जिव जात आहे किती लोक मरत आहे. रात्री आय.ए.एस., आय.पी.एस. व एम.पी.एस.सी.चा अभ्यास करणारे विद्यार्थी, आजारी लोक,

वयस्कर लोक असतात. या गोष्टीची दखल का घेतली जात नाही. काय कारण काय आहे. मेनका गांधी म्हणतात, त्यांना पशुंना प्रेम आहे. हे पशु यांना आम्ही मानवाचा दर्जा दिलेला आहे, यांना आम्ही आमचा सरनेम लावतो, असे म्हणतात समाजामध्ये मनुष्य प्राणी असतो, जर रेपीस्ट, मर्डर करणारा, दारु पेऊन शिवीगाळ करणाऱ्यावर गुन्हा दाखल होतो संविधानामध्ये तर अश्या कुत्र्यांना काय करायचे जे घरगुती कुत्र्यांना त्रासदायक आहे, मानव जातीला त्रासदायक आहे. तर आम्हाला नाईलाज झाले आणि येथे यावे लागले. कारण आधीही भरपुर निवेदन दिले गेले, पण निर्बीजीकरणाची प्रक्रिया सुरु झालेली नाही. त्याचे जी कारणे आम्हाला दिली जातात न करण्याचे ते आम्हाला मनाला पटत नाही. मेनका गांधींचा जे घर आहे त्यांच्या घराजवळ जर जळगांवचे दोन चार कुत्रे सोडुन दिले ना. तेव्हा त्यांना कळेल की, कुत्रे काय करु शकतात. तर या गोष्टीची दखल महानगरपालिका का घेत नाही हे विचारायला आज आम्ही येथे आलो आहे. माणसांची भाषा कळत नाही म्हणुन कुत्रे घेऊन आलेलो आहोत. याच्यामध्ये आलेले आहे, गोलु घोष कुटुंब, वियो माळी कुटुंब, जेनी रापाल कुटुंब, जीमी इंगळे कुटुंब, गुफी कोल्हे परिवार, रोची चौधरी परिवार, मुफी विसपुते कुटुंब, सॉल्टी पेट शॉप, जीमी वाघ कुटुंब आणि मॅक्स रंधे कुटुंब.

**मा.सभापती :-** आता आपणच स्वत: सन्मा.मेनका गांधी यांचे नाव घेतले म्हणजे आपल्याला संपुर्ण विषय माहित आहे.

**श्रीमती सरिता माळी :-** (निवदेन धारक) माहिती आहे.

**मा.सभापती :-** आणि ही अडचण सर्व नागरीकांना माहित आहे आणि राहिल जो निर्बिजीकरणाचा विषय होता. त्याच सुध्दा आपण टेन्डर दिलेले होते. म्हणजे दोन तीन वेळा आपल्याला टेन्डर पब्लीश कराव लागल. त्यात एक एजन्सी आपल्याकडे काम करायला तयार झाली आणि त्या एक एजन्सीने काम सुरु पण केलेले होते. परंतु आपल्या शहरातील काही नागरीकांनी त्यांची तक्रार पी.एम.ओ. ऑफिसला केली. त्या तक्रारीमुळे त्यांच कामच बंद नव्हे त्यांच लायसन्स रद्द केले गेले. आणि ही तांत्रिक अडचण असल्यामुळे आपल्या शहरामध्ये आज रोजी त्यांच काम थांबलेल आहे. आता आपण परत त्याच नविन टेन्डर पब्लीश करुन नविन एजन्सीला काम देण्याचा प्रयत्न करु.

**श्रीमती सरिता माळी :-** (निवदेन धारक) मला एक सांगा वस्तीगृहाच प्रकरण फेक होत पण सत्ताधाऱ्यांनी त्याचा व्हिडीओ बनवुन पुर्ण गावाची बदनामी केली. एका वयस्कर माणसाचा जबडा कुत्र्यानी खाल्ला, याचा कधी व्हिडीओ बनवुन तेथे गेला नाही. मग करता काय आहे. निवडुन दिलेले आहे लोकांनी, यांच्या गल्लीत पण कुत्रे भुकतात, मी कोल्हे बंगल्यात राहते तेथे ही कुत्रे भुकतात.

**मा.सभापती :-** आपला जो विषय आहे त्या विषय पुरतच बोलु आपण.

**श्रीमती सरिता माळी :-** (निवदेन धारक) नाही पण मी सांगत आहे की, जे सत्तेवर बसलेले आहे ना त्यांच काम आहे हे की, या छोट्या छोट्या समस्यांना तुम्ही सिरियसच घेत नाही. कोणीच सिरियस घेत नाही. १५ दिवसाच्या आत जर तुम्ही याचा निकाल लावला नाही तर जितके जळगांव शहरात पाळीव कुत्रे आहे ते जास्तीत जास्त संख्येत येथे जमवु आणि नाईलाजाने कोणाला दुखापत झाली त्या पिसाटलेल्या कुत्र्यांपासुन तर सरळ ते कुत्रा होईन आणि जो जख्मी असेल ते मी महापालिकेच्या दारावर सोडुन देईन.

**मा.सभापती :-** माझी आपल्याला सर्वांनाही विनंती आहे की, आपण सर्व एक जनहित याचिका दाखल करा.जेणे करुन आपल्याला न्याय मिळेल.

**श्रीमती सरिता माळी :-** (निवदेन धारक) मेनका गांधींचे म्हणणे आहे की, प्राण्यांवर प्रेम करा. आम्ही प्राण्यांना बरोबरीचा दर्जा दिलेला आहे.

**मा.सभापती :-** मा.न्यायालयाच्या आदेशाच आपल्याला पालन कराव लागेल.

**श्रीमती सरिता माळी :-** (निवदेन धारक) मला सांगा एखादा विषारी साप जर घराच्या आजु बाजुला डिटेक्ट झ ाला तर आपण काय करतो.

**मा.सभापती :-** यात दोन प्रकार आहे एकतर मारतो नाही तर पकडुन कुठेतरी सोडतो.

**श्रीमती सरिता माळी :-** (निवदेन धारक) हेच कुत्र्यांच्या बाबतीत का नाही होत आहे.

**मा.सभापती :-** विषारी साप सुध्दा मारले जातात असे नाही. आता जे सर्पमित्र असतात ते पकडतात. त्यांना जंगलात सोडुन देतात.

**श्रीमती सरिता माळी :-** (निवदेन धारक) पिसाटलेले कुत्र्यांच्या जमातीचा एक प्रकार असतो की, एक पिसाटला आणि तो एक गृपमध्ये गेला तर बाकीचे पण पिसाटले जातात.

**मा.सभापती :-** हे काही कुत्रे आपण मागे पकडुन इतर ठिकाणी सोडत होते. पण जे आजुबाजुचे खेडे आहे तेथुन तक्रार येत होती. तर आता शेवटी करायचे तर काय असे विषय आहे.

**श्रीमती सरिता माळी :-** (निवदेन धारक) निर्बिजीकरणाची जी प्रक्रिया थांबविलेली आहे ती पुन्हा सुरु करावी. आणि ज्या कुत्र्यांवर आजार असेल रॅबीज, तुम्हालाही माहित आहे. जो आजारी कुत्रा असेल त्यानी जर माणसाला चावले तर ते आजार माणसात पण येतो. तर त्या आजारावर काही तरी नियंत्रण आणावे आणि जर कोणतेही संस्थेचे संघटनेचे सहकार्य मिळत असेल तर महाविकास आघाडी शिवसेना तुमच्या सोबत आहे.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** ताई तुम्ही सत्ताधारीच नाव घेतात, साहेबांकडे सगळयात पहिला कुत्रा मीच आणला होता.

**श्रीमती सरिता माळी :-** (निवदेन धारक) धन्यवाद, आता आमच्या मोर्च्यात येऊन उभे राहा, निवेदन द्या आमच्या सोबत.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** देऊ ना, त्यात काय घाबरायचे.

**श्रीमती सरिता माळी :-** (निवदेन धारक) निवेदन देणारा महानगरपालिकेच्या बाहेरचा कुत्रा आहे. आयुक्त साहेब घ्या तुमच्याकडे आलेलो आहे आम्ही खास.

**मा.सभापती :-** तुम्ही तर पाळीव कुत्रा घेऊन आले.

**श्रीमती सरिता माळी :-** (निवदेन धारक) नाही बाहेरचाच आहे, महानगरपालिकेच्या बाहेरचा आहे. आणि आम्हाला तुमची काळजी होती, सभेची काळजी होती म्हणुन आम्ही पाळीव कुत्रे आणले.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** आम्ही सभा चालु होण्याच्या पहिले आणले होते.

**मा.आयुक्त :-** सभागृहाची शिस्त आपण राखली तर नागरीक राखतील. आपणच जर नाही राखली तर नागरीकांच्या समोर काय करणार.

**(निवेदन देण्यासाठी आलेले सर्व नागरीक कुत्रे घेवुन सभागृहाबाहेर निघुन गेले)**

**श्री.नितीन लढ्ढा :-** सभागृहात सभापतीच्या परवानगी शिवाय येणे कदाचित उचित नसेल. परंतु विषय जो आहे तो अत्यंत गंभिर आहे. म्हणजे त्यांची मागणी जी आता मी ऐकली, पिसाटलेल्या कुत्र्यांसंदर्भात, मला वाटत केंद्र शासनाने केलेला कायदा ते सर्वोच्च न्यायालयाने दिलेले निवाडे याच्यात मला वाटते पिसाटलेल्या कुत्र्यांना मारण्याच्या संदर्भात कुठेही प्रतिबंध करण्यात आलेला नाही. साधारणता कुत्र्यांची संख्या आज जळगांव शहरात २० ते २५ हजाराच्या घरात आहे. निर्बिजीकरण सुध्दा याच्यावर कायमस्वरुपी तोडगा नाही. कारण आज जळगांव शहरात असलेले सर्व कुत्र्यांचा निर्बिजीकरणही केले तरी सरासरी एक कुत्र्याचे आयुष्य १० ते १२ वर्षाचा कुत्र्याच आयुष्य असतो. म्हणजे आज निर्बिजीकरण १००% यशस्वी झाल, तरी ८ वर्ष, १० वर्ष, १२ वर्षापर्यंत ही कुत्र्यांची संख्या जी आहे शहरामध्ये अस्तीत्वातच राहील.परंतु मुख्य जो प्रश्न आपण यांच्या चर्चेतुन ऐकले की, पिसाटलेले कुत्रे, साधारणता बरेच मोकाट कुत्रे जे असतील, सगळेच उपद्रोही असतात अश्यातलाही भाग नाही. परंतु पिसाटलेले कुत्रे उपद्रोही आहे आणि त्याचा चावा घेतल्यानंतर ते इतर कुत्र्यांशी जेव्हा भांडतात, इतर कुत्र्यांना चावा घेतल्यानंतर इतर ही कुत्रे पिसाटतात. म्हणजे पिसाटलेल्या कुत्र्यांचा जर वेळेत जर बंदोबस्त नाही केला. तर पिसाटलेल्या कुत्र्यांच्या संख्येमध्ये मोठया प्रमाणात वाढ होऊ शकते. आणि पिसाटलेल्या कुत्र्याने माणसाला चावा घेतल्यानंतर त्याची काय अवस्था होते. सगळयांना माहित आहे. यामुळे पिसाटलेल्या कुत्र्यांचा बंदोबस्त करणे संदर्भात प्रशासनाने कुठेतरी याचे धोरण ठरवावे. त्याच्या कायद्याचा अभ्यास मला वाटते अजुन कोणी केलेला असेल तर ठिक आहे नसेल तर त्याच्यावर कायदा काय म्हणतो, सर्वोच्च न्यायालयाचा झालेला निवाळा काय म्हणतो. आणि जर कधी पिसाटलेल्या कुत्र्यांना मारण्याच्या संदर्भात प्रतिबंध नसेल तर तश्या पध्दतीने ते कृती आराखडा तयार करायला पाहिजे प्रशासनाने आणि मोकाट कुत्र्यांपैकी सगळयात पहिले पिसाटलेल्या कुत्र्यांचा बंदोबस्त करणे गरजेचे आहे.

**श्री.कुलभुषण पाटील :-** सभापती महोदय, ही कन्डीशन अशी आहे की, याच्यामध्ये कायद्याने शासनालाही अडचण येत आहे. त्यांनी यासाठी टेन्डर प्रक्रिया राबविली पण होती. ते टेन्डर चालु पण झाल होत. ते काही अंतर्गत राजकारणामुळे ते टेन्डर प्रोसेस पुर्ण झालेनंतर सुध्दा सदर व्यक्तीला काम करु दिले नाही. सामाजीक संघटनांनी त्याच्यामध्ये आडा घातला. असेच प्राण्यांवरती प्रेम करणारे जे आहे. भाऊ यांना जर इतकेच वाटते ना पिसाटलेले कुत्र्यांबद्दल तर साहेब सामाजिक संघटना वाल्यांना दोन दोन तीन तीन कुत्रे पाळायला देऊन द्या. त्यांनी ते पाळावे. त्यांना जर प्राण्यांबद्दल इतकेच प्रेम आहे तर त्यांनी दोन दोन चार चार कुत्रे पाळावे. भाऊ याच्यामध्ये महाविकास अघाडी आणि भारतीय जनता पार्टी हा विषय कुठुन आला. हा विषय येण्याचा काही संबंधच नाही. साहेब यांच प्राण्यांवर इतक प्रेम आहे ना, यांनी काय कराव. याचा त्रास सर्व सामान्य जनतेला

आहे, जळगांव शहरातील सर्व लोकांनाच आहे. त्याबद्दल वाद नाही. परंतु अश्या पध्दतीच राजकारण करणे हे साहेब एकदम चुकीचे आहे. त्याच्यावर प्रशासन पण नियोजन करत आहे आम्ही सत्ताधारी पण नियोजन करत आहे. त्याच्याबद्दल मी एक वेळेस नाही चार वेळेस भेटलो. त्या सदंर्भात साहेब आपण निर्बिजीकरणच काम देखील चालु केल होत. परंतु या सर्व अंतर्गत राजकारणामुळे हे वापस अस्तवेस्त झाल आणि वापस तीच कन्डीशन झाली.

**श्री.नितीन लढ्ढा :-** नाही नाही, कुत्रे कोणत्याच पक्षाचे नसतात.

**श्री.कुलभुषण पाटील :-** हो कोणत्याच पक्षाचे नसतात परंतु आणणाऱ्यांनी सांगीतले ना ते की, आम्ही महाविकास अघाडीचे आहे आम्ही.

**श्री.नितीन लढ्ढा :-** व्यक्तींना पक्ष आहे कुत्र्यांना पक्ष नाही आणि मागणी जी आहे ती रास्त आहे.

**श्री.कुलभुषण पाटील :-** मागणी तर रास्तच आहे ना भाऊ.

**श्री.नितीन लढ्ढा :-** कुलभुषणजी याच्यातल म्हणण काय आहे की, जे पिसाटलेले कुत्रे असतील. जे त्या प्राणी जातीवर सुध्दा धोका आहे आणि मनुष्य जातीला सुध्दा त्याचा धोका आहे. तश्यांच्या संदर्भात माझे जे वाचण्यात आलेले आहे त्याला कायद्याने कुठेच प्रतिबंधक घालण्यात आलेला नाही. पिसाटलेल्या कुत्र्यांना मारण्याच्या संदर्भात. सर्वोच्च न्यायालयाच्या निवाळयात ही नाही किंवा केंद्र सरकारने जो कायदा केलेला आहे त्यात ही नाही. फक्त पाळीव कुत्रे किंवा जे कुत्रे उपद्रोह करत नाही. त्यांना मारण्याच्या संदर्भात प्रतिबंध आहे.

**श्री.कुलभुषण पाटील :-** मागचा विषय बाकी आहे, माझे म्हणणे इतकेच आहे की, आपण या मक्तेदाराला ४५० मजुर पुरविण्याचे कार्यादेश दिलेले होते. प्रत्यक्षात तसे न होता आपल्याकडे १०० ते १५० माणसे पुरविले जातात माझ्या माहितीनुसार मी जी माहिती घेतली. जर उद्या उठुन हा मक्तेदार जर कोर्टात गेला, यानी आपल्यावर असा दावा दाखल केला, जसे आपण वॉटरग्रेसच्या बाबतीत म्हणतो. कार्यादेश इतके लोकांचे दिलेले असतांना मी काम करायला तयार असतांना महानगरपालिकेला रिक्वॉयरमेंट असतांना महानगरपालिकेने इतके लोकांच काम करुन नाही घेतले अशी याचिका दाखल केली. कायद्याने तो भुर्दंड बसु शकतो. आमची आपल्याला या सभागृहात विनंती आहे. समजा कोविड सुरु आहे आणि त्या माणसांना आपल्याकडे ज्या ठिकाणी वॉटरग्रेसचे माणसे कमी आहे. ज्या ठिकाणी आपले महानगरपालिकेचे लोक काम करत आहे पण ते वेळेवर होत नाही. ज्या ठिकाणी माणसांचा पुरवठा कमी पडत आहे. अश्या ठिकाणी जर आपण त्या मक्तेदाराला सांगितले की, माणसे पुरव, तर त्याला त्या माणसांचे दिलेले कार्यदेश पण पुर्ण होतील आणि आपले काम पण सुरु राहतील. आपल्याला ही विनंती आहे.

**श्री.पवन पाटील, सहा.आयुक्त :-** आपण ही जी टेन्डर प्रोसेस केली होती. ती वर्ष भरापुर्वी केली होती म्हणजे त्यावेळेस किरकोळ होता कोरोना आणि पुढील तिन महिन्यासाठी जेव्हा आपल्याकडे पॉझिटीव्हची संख्या डबल होईल. हा अंदाज करुन ही टेन्डर प्रोसेस केली होती. म्हणुन आपण अशी शक्य ती व्यवस्था केली होती की, जास्तीत जास्त कोविड सेंटर तयार होतील. त्याकरीता तेथील साफसफाईला आपल्याला जास्तीत जास्त कामगार लागतील. परंतु आपण त्याच्यात एक शब्द असा घेतला होता. आपण मजुर पुरवठा करत असतांना मक्तेदाराला कळवत असतांना आवश्यक त्याप्रमाणे आपल्याला जेवढी संख्या लागतील तेवढाच आपण त्यांना पेमेंट करणार आहोत. आवश्यकतेप्रमाणे हा शब्द आपण घेतला होता. त्यानंतर आपल्याकडे रुग्णांची संख्याही कमी झाली आणि होम कॉरेन्टाईन सुरु झाल्यामुळे आपले कोविड सेंटर ही हळुहळु कमी होत गेले. त्यामुळे जे लागणारे कर्मचारी आहे त्यांचा पुरवठा कमी होत गेला. आता सद्या आपल्याकडे चार कोविड सेंटर चालु असल्याने आवश्यकतेप्रमाणे आपण कर्मचारी घेत आहोत.

**मा.सभापती :-** म्हणजे ४५० कर्मचाऱ्यांची मर्यादा आहे, ४५० च्या आत आपण आवश्यकता भासेल तेवढे कर्मचारी आपण घेऊ शकतात.

**श्री.पवन पाटील, सहा.आयुक्त :-** तेव्हा कोरोना एकदम पिकवर होता ना तर रुग्णांची संख्या पाहुन तेव्हा कोरोना फास्ट आपल्याकडे पसरत होता म्हणुन आपण ती प्रोसेस केलेली होती. ऐवढे सेंटर आपण दाखविले होते तेवढे सेंटर्स आपले झालेले नव्हते ना. आपल्याकडे जसे जसे सेंटर वाढतात आपण तसे तसे मक्तेदाराला कळवितात. आपण त्याप्रमाणे मजुर पुरवठा करुन घेतो.

**श्री.कुलभुषण पाटील :-** फक्त त्याच्या न्यायालयीन बाब काही होणार नाही याची काळजी घ्या फक्त.

**सौ.ज्योती चव्हाण :-** आता जर रुग्ण संख्या वाढली तर कर्मचारी दोन शिफ्टमध्ये करता येतील ना.

**श्री.पवन पाटील, सहा.आयुक्त :-** सद्याही तीन शिफ्ट मध्ये आपण साफसफाई करुन घेतो.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** एकच्या जागी दोन वाढुन घ्या ना.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र. ३२१ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, जळगांव महानगरपालिका अंतर्गत शहरातील म.न.पा.चे विविध ठिकाणचे कोविड-१९ रुग्णासाठी तयार केलेले सी.सी.सी. व क्वॉरटाईन सेंटर येथील शौचालय, मुताऱ्या, रुम पॅसेज, परिसर स्वच्छ करणे व या ठिकाणी औषधी फवारणी करणे इत्यादी कामी दैनंदिन ४५० (आवश्यकतेप्रमाणे) कामगारांचा पुरवठा करणे महापालिकेने ठरवलेले किमान वेतन दर रु.५२९/- प्राप्त सेवा कर रु.०.०१/- असे एकूण रु.५२९.०१/- प्रती दिन प्रती कामगार प्रमाणे एका दिवसाला रु.२,३८,०५४.५०/- प्रती दिवस आणि ३० दिवसांकरीता रु.७१,४१,६३५/- खर्च येणार असून ६ महिन्यांकरिता रक्कम रु.४,२८,४९,८१०/- येणाऱ्या खर्चास स्थायी समिती ठराव क्रं.२६६ दि.२५/०८/२०२० अन्वये मान्यता प्रदान करण्यात आलेली असून त्याबाबत महानगरपालिकेस दि.३१/०८/२०२० रोजी करुन दिलेली संविदा नूसार मे.दिपक उत्तराधी अमरावती यांना मक्ता देण्यात आलेला आहे.

तसेच सध्यस्थितीत सदर मक्तेदाराचे कोरोना टेस्टींग लॅब व दि.१८/०२/२०२१ पासून पॉलटेक्निक कॉलेज येथे नविन सी.सी.सी. व क्वॉरटाईन सेंटर कार्यान्वीत केलेले असून सदर ठिकाणी मक्तेदाराकडुन आवश्यकतेनुसार कामगार पुरवठा करण्यात आलेला असून पुरवठा केलेल्या कामगारांकडुन दैनंदिन साफ सफाईचे काम करवून घेण्यात येत आहे.

त्या अनुषंगाने मे.दिपक उत्तराधी, अमरावती यांची सदर कामाची मुदत दि.२८/०२/२०२१ रोजी संपुष्टात येत असल्याने कोरोना कोविड-१९ चा प्रादुर्भाव रुग्ण संख्येत वाढ होत असून सदर मक्तेदार यांना पुन्हा (आवश्यकतेप्रमाणे) कामगार पुरवठा करणेसाठी मंजूर दरातच दि.०१/०३/२०२१ पासून ३ महिन्याकरिता मुदतवाढ देणेस व मक्तेदाराने सदर कामासाठी दैनंदिन प्रत्यक्ष पुरविलेल्या कामगारांचे येणाऱ्या खर्चास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने सदर प्रकरणी नियमानुसार शासन निर्णय / आदेशा नुसार आवश्यक त्या सर्व बाबींची पुर्तता करुन कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकुल मते :- १३** **प्रतिकुल मते :- ००**

**सुचक :- दारकुंडे नवनाथ विश्वनाथ**

**अनुमोदक :- बाविस्कर किशोर रमेश**

**नगरसचिव :- विषय क्र. २:-** कोवीड-१९ केअर सेंटर व विलंगीकरण कक्षातील (Quarantine) नागरीक/रुग्णांसाठी चहा, नाश्ता, जेवण (मटेरिअल व मजुरीसह) पुरवठा करणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

**सौ.ज्योती चव्हाण :-** सभापती महोदय, विषय मान्य करण्यात यावा, ज्याला हा मक्ता मिळाला आहे त्यांनी फक्त जेवणाची क्वॉलिटी मेनटेन ठेवायला पहिजे सुचना द्यायच्या आहे त्यांना. कोणत्याही प्रकारचे जेवणामध्ये आळी निघाली नाही पाहिजे. जेवण हे चांगल्या क्वॉलिटीचे चांगल्या पध्दतीचे असाव. या सुचना पहिलेच देण्यात याव्यात.

**श्री.नितीन लढढा :-** मा.महापौर स्वत: तेथे जाऊन जेवणाचा स्वाद घेत असतील तर निश्चितपणे जेवणाची क्वॉलिटी चांगली असेल. परंतु याच अनुषंगाने एक विषय आहे की, आता आपला व्हॅक्सीनेशन सेंटर सुरु झालेले आहे. साधारणता मला वाटते की, २०० ते २५० पेशन्ट प्रति दिवसात ३५० पर्यंत, आता याच अनुषंगाने सर कसे आहे. राज्य शासनाने किंवा केंद्र शासनाने या संदर्भात खाजगी रुग्णालयांना सुध्दा व्हॅक्सीनेशनच्या परवानग्या दिलेल्या आहे. साधारणता २९ खाजगी सेंटर्सला सुध्दा परवानगी दिलेली आहे. परंतु खाजगी हॉस्पीटलला तेथे रु.२५०/- प्रति व्हॅक्सीनेशनचा खर्च येतो. आणि त्याच्या मध्ये अजुन एक बाब अशी निदर्शनास आली की, काही खाजगी डॉक्टर्स या रुग्णांना एक साधारणता ३०० ते ४०० रुपयाचा प्रिस्क्रप्शन

देऊन देतात.साधारणता व्हॅक्सीनेशन घेतल्यानंतर एखाद दोन क्रोसीनच्या गोळयांची आवश्यकता पडते याच्या व्यतिरिक्त दुसऱ्या काही ट्रिटमेंटची आवश्यकता पडत नाही. परंतु आता परवाच आमचा एक मित्र एका खाजगी रुग्णालयात गेला होता. पती पत्नी दोन्ही आणि तेथे खाजगी डॉक्टरांकडुन व्हॅक्सीनेशन घेतल्यानंतर दोघांना प्रत्येकी रु.३२५/- प्रिस्क्रप्शन लिहुन देण्यात आल, आणि सांगण्यात आले की, आमच्या मेडीकल वरुनच या मेडीसीन घेण्यात याव्यात. त्यानी मला व्हाटसअॅपला त्या प्रिस्क्रप्शनची कॉपीही पाठविली. कसे आहे बघा साधारणता एक चांगल्या भावनेने केंद्र शासन राज्य शासन सवलतीच्या दरामध्ये व्हॅक्सीनेशन व्हावे या एक चांगल्या उद्देश घेऊन काम करत असतांना काही जे व्यवसायीक असतील याच्यातले. मेडीकल व्यवसायातले.ते कुठेतरी याचा दुरउपयोग करतांना दिसुन येतात. म्हणजे साधारणता काय असत की, जे हॉस्पीटल आहे ते मेडीकल त्यांच्याच अंतर्गत चालवत असतात. आणि तिनशे रुपयाच मेडीकल प्रिस्क्रप्शन दिल्यानंतर साधारणता त्याला १० ते १५ रुपयांची क्रोसीनची आवश्यकता मॅक्सीमम पडते ते ही सरसकट पडत नाही. परंतु अश्या परिस्थितीत जर कधी रु.३००/- चा भुर्दंड वेगळया मार्गाने जर कधी त्या रुग्णांवर थोपविला जात असेल तर मला वाटते कुठे तरी आपण प्रशासन म्हणुन आपण या गोष्टींकडे लक्ष देणे अपेक्षित आहे. आणि त्याच पध्दतीने जसे खाजगी रुग्णालयामध्ये रु.२५०/- व्हॅक्सीनेशनचे दर आणि हा जो काही छुपा खर्च लागतो तो भाग, यापेक्षा जर आज आपण बघा रुग्ण संख्या नियंत्रणात ठेवण्याच्या दृष्टीकोणातुन आपण त्यांना कॉरंटाईन सेंटर मध्ये आपण त्यांना विविध प्रकारच्या फॅसीलीटी प्रोव्हाईड करतो आहे. चांगला उपक्रम आहे तो. ते गरजेच सुध्दा आहे. त्याच पध्दतीने जर कधी रोग वाढणार नाही किंवा रोग होणार नाही. या दृष्टीकोणातुन व्हॅक्सीनेशनवर लक्ष केंद्रीत केले. आणि जास्त लक्ष केंद्रीत करुन आज आपल्या शाहुमहाराज रुग्णालयाला एक सेंटर सुरु आहे. शासकीय,म्हणजे आपला महापालिकेचा, शासकीय सिव्हीलला असेल किंवा अजुन कुठे तरी सुरु करण्याचे संदर्भात वृत्तपत्रात बातमी वाचली.महानगरपालिकेच्या वेगळया वेगळया भागांमध्ये आपल्या शाळा सुध्दा आहे. आणि आपले दवाखाने सुध्दा आहे. जर कधी जास्तीत जास्त महानगरपालिकेने, कारण व्हॅक्सीन तर गव्हर्नमेंटकडुन मिळत आहे आपल्याला, व्हॅक्सीनचा तुटवडा नाही, व्हॅक्सीन मुबलक प्रमाणात उपलब्ध आहे. परंतु या सामान्य माणसांना हा जो रु.२५०/- चा भुर्दंड आहे.तो सुध्दा आज बघितल, तर सामान्य कुटुंबात एका कुटुंबात ४ व्यक्ती असल्यास रु.१०००/- व्हॅक्सीनेशनच्या एका डोसला लागतात. २८ दिवसानंतर पुन्हा रु.१०००/- लागतात. म्हणजे रु.२०००/- खर्च त्या चार लोकांच्या फॅमिलीला आजच्या या आर्थिक मंदीच्या काळामध्ये सर्वसामान्याला परवडणारा नाही. तर या बाबतीत माझी सुचना आहे की, अश्या पध्दतीने आपले जितके सेंटर्स आपल्याला वाढविता येतील. आणि फ्री व्हॅक्सीनेशनच्या संदर्भात जर आपण पुढाकार घेतला. तर भविष्यात आपण हा जो कॉरंटाईन सेंटरवर करणारा खर्च आहे त्याच्यामध्ये कपात होऊन रुग्ण संख्या ही रुग्ण तयार होण्याच्या पुर्वीच आटोक्यात येईल. आणि जास्तीत जास्त व्हॅक्सीनेशन झाला तर एक हार्ड ईयुमिनीटी तयार होऊन कदाचित या कोरोनाच्या रुग्णांना भविष्यात मुक्तता मिळेल.या बाबतीत व्हॅक्सीनेशन वाढविण्याच्या दृष्टीकोणातुन प्रशासनाने काय नियोजन केलेले आहे. आणि काय करणार आहे या संदर्भात माहिती सभागृहाला अवगत करण्यात यावी.

**मा.आयुक्त :-** सन्मा.सदस्यांनी ज्या सुचना मांडलेल्या आहे ते अतिशय योग्य आहे. आताची जी काही सद्या कोविडची परिस्थिती आहे. त्यासाठी अतिशय उपयोगाचे आहे. अर्थातच प्रशासन या सर्व गोष्टींवर गांभिर्याने लक्ष देईल. दोन मुद्दे आपण उपस्थित केलेले होते. पहिला मुद्दा ज्या ठिकाणी खाजगी मध्ये पेड बेसिसवर व्हॅक्सीनेशन केले जाते. अश्या ठिकाणी अत्यंत सवलतीच्या दरामध्ये राज्य आणि केंद्र शासनाकडुन व्हॅक्सीन पुरविली जाते त्याचे दर रु.२५०/- आहे.परंतु व्यावसायीकांना किंवा मधले कोणी म्हणु नये. परंतु काही वेगळया हेतुने कोणी अननेसेसरी मेडीकल प्रिस्क्रप्शन जर देत असतील. आणि अश्या पध्दतीने जर विनाकारण औषध खरेदीवर खर्च करावा लागत असेल. तर अश्या बाबतीमध्ये आय.एम.ए. कडुन सर्वच मेडीकल प्रॅक्टीशनर्सला सुचना करु सिव्हील सर्जन सोबत आढावा घ्यावा लागेल. त्यांच्या मार्फत या सर्व सुचना दिल्या जातील. सर्वसाधारणपणे आता लसीकरणाची प्रोसेस सुरु होऊन आता दोन एक महिन्याचा कालावधी होत आला. आता हे दोन एक महिन्याचा कालावधी जर घेतला तर पोलिस लोक, हेल्थ वर्कर्स आणि शासकीय कर्मचारी आणि आता जे सिनियर सिटीजन आहे.ज्यांची वय ६० वर्षापेक्षा जास्त आहे. किंवा ४५ वर्षाच्यावरचे ज्यांना अनेक प्रकारचे आजारी आहे. अश्या लोकांना आपण या केंद्रावर लस देतो आहे. आता जर बघितले तर

सुरुवातीचे पिरियड मध्ये लसीकरण करणेसाठी मागेपुढे केल, पण नंतर नंतर बघितले तर ते अत्यंत कमी झालेल्या आहे.आपण म्हणत आहात की, बहुतांशी नागरीकांना लस घेतल्यानंतर ताप बद्दल कुठलीही मेडीसीन देण्याची गरज लागत नाही. पण अनावश्यक मेडीसीन देणे आणि नागरीकांच्या खर्चामध्ये वाढ करणे, याला आताच्या परिस्थिती मध्ये काही अर्थ नाही. त्या निमीत्ताने आपण त्यांना सुचित करु. दुसरी आपली सुचना होती की, शासकीय लसीकरण केंद्रात वाढ झाली पाहिजे. आता सुरुवातीला आपले जे हे होते हेल्थ वर्कर्स यांच्या बाबतीमध्ये सुचना अश्या होत्या की, फक्त शासकीय केंद्रावरती द्या. पण आपण ते खाजगी दवाखान्यामध्ये सुरु केलेली होती. आता त्याच्यानंतर आपण सर्वसाधारण नागरीकांसाठी सुरुवात केली होती. आपण त्याच्यामध्ये कोव्हालमेंट असणारे किंवा ६० वर्ष वयापेक्षा जास्त असणारे हे जे दोन कॅटेगीरी मध्ये बसणारे लोक आहे त्यांना अजुनही याची कल येण्यासाठी वेळ आहे. अश्या परिस्थितीमध्ये काही खाजगी दवाखान्यांना परवानगी दिलेली आहे. त्याठिकाणी नागरीक स्वत: जाऊन रु.२५०/- देऊन घेऊ शकता. आपले जे शहरामध्ये सेंटर आहे. एक आपल्या जी.ॲण्ड पी. मध्ये सुरु आहे एक आपल्या शाहु महाराज रुग्णालयामध्ये आपल मोफत सेंटर आणि शाहु महाराज वाल्यांच पेड सेंटर असे दोन सेंटर चालु आहे. आता याच्यामध्ये एक जे जी.ॲण्ड पी. मधला सेंटर होत. आपण बऱ्याच वृत्तपत्रामध्ये वाचल असेल. थर्ड फ्लोअरला आहे. तेथे नगारीकांना जायला यायला त्रास होत म्हणुन ते ग्राऊंड फ्लोअरला शिफ्ट करायचे जिल्हाधिकारी यांनी सुचना दिलेल्या नंतर आता ते शिफ्ट होत आहे, रोटरीच्या हॉल ग्राऊंडमध्ये सुरु करणार आहे. आता या व्यतिरिक्त आपल्याला शहरामध्ये जास्तीत जास्त लोकांना मोफत लसीकरणाची सुविधा करेल विशेष जे आर्थिक दृष्ट्या अत्यंत कमकुवत आहे. शासनाकडुन जो पर्यंत सेंटर मंजुर होत नाही आपल्याला आपल्या स्तरावरती शासकीय लसीकरण केंद्र वाढविता येत नाही. आता आपण शासनाकडे पाच केंद्राची सुरुवातीला मागणी केलेली आहे. आता आपला एक आहे आणि जी.ॲण्ड पी. ची सुरुवात झालेली आहे. सुदैवाने आज संध्याकाळी आदरणीय मुख्यमंत्री महोदयांची व्हिडीओ कॉन्फ्ररन्स आहे. त्यामध्ये या लसीकरणावर चर्चा होईल. आपण आपली मागणी जिल्हाधिकाऱ्यांमार्फत आदरणीय मुख्यमंत्र्यांकडे मांडु या. आणि जेवढी काही लसीकरण सेंटर्स आपल्याला आपल्याकडील उपलब्ध मनुष्यबळाची संख्या विचारात घेऊन जेवढया लवकर आपल्याला लसीकरण केंद्रांची संख्या वाढविता येईल त्यासाठी आपण प्रयत्न करु. जे आपण म्हणतो की, प्रिवेन्शन इज ऑलवेज बेटर देन क्युअर. तर आपल्याला कोरोनाच होऊ नये आणि झाला जरी तर त्याचा त्रास लोकांना होऊ नये, एकदा लसीकरण झाल की, रुग्णाला होणारा त्रास किंवा रुग्णांची संख्या त्याच्यावर आपले कोविड टेस्ट सेंटर असेल किंवा जी.एन.सी. मधील परिसर असेल.तो ही आपल्याला करता येईल. या दृष्टीने लसीकरण केंद्र वाढविण्याचा प्रयत्न जिल्हाधिकाऱ्यामार्फत आपण करु.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** शिवाजी नगरचाही दवाखाना घ्या.

**मा.आयुक्त :-** जसे नितीन भाऊंनी सांगितले की, शहराच्या वेगवेगळया भागांमध्ये, जर एकच ठिकाणी असेल तर दुरुन यायला लोकांना त्रास होतो. जर सेंटर्सची संख्या वाढत गेली. तर शहरातील सर्व वार्डांमध्ये आपल्याला त्याच सेंटर सुरु करता येईल.आपला स्वत:चा एखादा दवाखाना असेल नसेल किंवा एखादी खाजगी इमारतीची आपण व्यवस्था करु. ज्या ठिकाणी नागरीकांची सोय होईल त्या ठिकाणी.

**श्री.नितीन लढ्ढा :-** सामान्य माणसाला काय होऊन जाते की, दुर सेंटर आहे मोफत आहे, परंतु मेहरुणचा माणुस असेल पिंप्राळयाचा माणुस असेल. तो म्हणतो इतके दुर जायचे पुन्हा तेथे तितकी गर्दी आणि त्या गर्दी मध्ये दोन तीन तास थांबायचे, याच्यामुळे लोक थोडेसे अवाईड करतात. सेंटर जर जवळ असेल घराचे तर लोकांना उत्साहाने तेथे जाणेच्या संदर्भात वातावरण निर्मीती होईल आणि लवकर लसीकरण लवकर योग्य पध्दतीने होऊन जास्तीत जास्त रुग्ण संख्या याच्यामध्ये व्यापली जाईल.

**मा.सभापती :-** लसीकरणाचे केंद्र आपल्याला कसे सुरु करता येईल याचेसाठी प्रयत्न करु.

**श्री.नितीन लढ्ढा :-** नाही, या संदर्भात जर डॉक्टरांची संख्या किंवा परिचारिकांच्या संख्या वाढविल्या. मी म्हणतो आपण इतर गोष्टींवर जितका खर्च करतो आहे. त्यापेक्षा निश्चित कमी खर्चामध्ये या लसीकरणाला संपुर्ण शहराला मोठया प्रमाणावर फायदा होईल. तर त्याचा सुध्दा अश्या पध्दतीने मानधनावर डॉक्टर्स आणि परिचारिका घेण्याच्या संदर्भातली भुमिका असेल तर तश्या पध्दतीने सुध्दा विचार करावा.

**मा.आयुक्त :-** घेता येईल आपल्याला, आपण मागच्या वेळेस पण घेतले होते. आता आपण बघितल असेल तर काही वृत्तपत्रात आताही जाहिरात दिलेली आहे. त्याच्यामध्ये डॉक्टर्स पासुन तर वार्डबॉय पर्यंत कोविड सेंटर किंवा लसीकरण सेंटर त्या दोन्ही ठिकाणी लागणारे कर्मचारी आपण कॉन्ट्रॅक्ट बेसीसवर घेतो आहे. या व्यतिरिक्त माझी सर्व सन्मा.सदस्यांना आणि काही वृत्तपत्राचे प्रतिनिधी येथे आहे सर्वांना माझी विनंती राहील. जाहिरातींना प्रतिसाद म्हणुन म्हणा किंवा आपल्या संपर्कात जर कोणी मेडीकल स्टॉफ किंवा कोरोना स्टॉफ असेल ज्यांची या ठिकाणी काम करण्याची ईच्छा आहे. त्यांना आमच्याशी संपर्क करायला सांगितल, त्यांना सुध्दा आपण त्यांना घेऊ. त्यांना मोठी संख्यात वर्ग करुन वेग वाढुन घेऊ. जर आपल्या मध्यमातुन सुध्दा जर कोणी काम करायला इच्छुक असेल तर त्याला संपर्क करायला सांगा.

**श्री.कुलभुषण पाटील**:- प्रस्ताव मान्य आहे.

**श्री.किशोर बाविस्कर** :- माझे अनुमोदन आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र. ३२२ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव कार्यक्षेत्रात कोवीड-१९ च्या रुग्णांच्या संख्या वाढत असल्याने कोवीड केअर सेंटर व विलंगीकरण कक्षातील (Quarantine) नागरीक/रुग्णांसाठी चहा, नाश्ता, जेवण (मटेरिअल व मजुरीसह) पुरवठा करणे आवश्यक असल्याने वृत्तपत्रात अल्पमुदतीची जाहीर EOI सुचना प्रसिध्द करुन ०६ पुरवठादार (केटरर्स) यांचे प्रस्ताव प्राप्त झाले होते त्यापैकी ०२ पुरवठादार (केटरर्स) लालाजी केटरर्स,जळगांव व पुजा केटरर्स,जळगांव यांचा प्रस्ताव स्थायी समिती कडेस सादर करण्यात आला होता.

स्थायी समिती ठराव क्र.२६९ दि.२८/०८/२०२० अन्वये लालाजी केटरर्स,जळगांव यांना मान्यता प्रदान करणेत आलेली आहे. त्या अनुषंगाने लालाजी केटरर्स,जळगांव यांनी आयुक्त यांच्या मान्यतेने कार्यादेश क्रं.१८१ दि.३१/०८/२०२० रोजी निर्गमित करणेत आले होते. त्यानुसार लालाजी केटरर्स,जळगांव यांनी कोरोना सेंटर येथे जेवण पुरवठा केलेला आहे.

परंतु, लालाजी केटरर्स,जळगांव यांच्या दि.२२/०२/२०२१ च्या पत्रान्वये जेवण पुरवठा करणेबाबत असमर्थता दर्शवली आहे. तसेच सदर पुरवठादार यांनी १० दिवस जेवण पुरवठा करणेस व तदनंतर सदर ठेका बंद करणेबाबत कळविलेले आहे.

कोवीड केअर सेंटर व विलंगीकरण कक्षातील (Quarantine) नागरीक/रुग्णांसाठी चहा, नाश्ता, जेवण (मटेरिअल व मजुरीसह) पुरवठा करणे अत्यंत आवश्यक व तातडीचे असल्याने यापुर्वी प्रशासनाव्दारे निवडण्यात आलेले पात्र पुजा केटरर्स,जळगांव यांना पुर्वी निश्चित करण्यात आलेली अनामत रक्कम रु.६०,०००/- घेवुन व अटी शर्तीचा करारनामा करुन जिल्हाधिकारी कार्यालय जळगांव यांचे पत्र क्र.टंचाई-४/कावि/२०१९/७/५२/१५६२ दि.२२/०७/२०२० अन्वये निश्चीत केलेला दर रक्कम रु.१४०/- मात्र प्रति रुग्ण प्रती दिननुसार कार्यादेश निर्गमीत करणेस तसेच सदर होणाऱ्या खर्चास मान्यता प्रदान करण्यात येत आहे. प्रशासनाने सदर खर्च नगरविकास विभागाकडील शासन निर्णय क्र.टीएफसी-८०१५/प्र.क्र.१०६/ नवि-०४ दि.१४/०९/२०२० अन्वये वित्त आयोगाच्या व्याज निधीतून करावा.

प्रशासनाने सदर प्रकरणी नियमानुसार शासन निर्णय / आदेशा नुसार आवश्यक त्या सर्व बाबींची पुर्तता करुन कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकुल मते :- १३** **प्रतिकुल मते :- ००**

**सुचक :- पाटील कुलभुषण विरभान**

**अनुमोदक :- बाविस्कर किशोर रमेश**

**नगरसचिव :- विषय क्र. ३**:- जळगांव शहरातील सार्व.शौचालयाच्या १६५५ सिट्सच्या दैनंदिन साफसफाई कामी ३ वर्षाच्या कालावधीसाठी येणारा एकुण खर्च रक्कम रुपये. २,२२,२३,३४०/- मात्रच्या खर्चास मान्यता मिळणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

**श्री.नवनाथ दारकुंडे** :- प्रस्ताव मान्य आहे.

**श्री. कुलभुषण पाटील** :- माझे अनुमोदन आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र. ३२३ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, मनपाचे सार्वजनिक शौचालयांच्या एकुण १६५५ सिट्सचे दैनंदीन साफसफाई करणे, शौचालयांमध्ये मनपा देईल ते दैनंदीन जंतुनाशके व दुर्गंधीनाशक टाकणे तसेच सार्वजनिक शौचालयांच्या ठिकाणी केअरटेकरची नेमणूक करणे या कामसाठीची ई-निविदा सुचना क्र.-५८ जा.क्र./आ.वि./७१७/२०२०-२१ दि.२१/०१/२०२१ रोजीच्या पत्रान्वये दै.पुण्यनगरी चे राज्यस्तरीय व विभागस्तरावर दि.२२/०१/२०२१ रोजीच्या दैनिकात तसेच शासन संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात आली आहे व त्याची मुदत दि.०४/०२/२०२१ पर्यंत देण्यात आली होती. सदर निविदेची निविदापुर्व बैठक दि.२८/०१/२०२१ रोजी घेण्यात आली असता बैठकीत उपस्थित मुदयांचा विचार करुन काही निविदा अटी शर्तीचा समावेश करण्यात येऊन निविदा सादर करणेस दि.१०/०२/२०२१ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली होती.

त्यास्तव सदर निविदा प्रक्रीयेत मुदतीपर्यंत तिन (३) निविदा प्राप्त झालेल्या आहेत. सदर प्राप्त निविदेचा लिफाफा क्रमांक १ व २ उघडून प्राप्त दरांच्या तुलनात्मक तक्त्याचे अवलोकन केले असता अ.क्रं.१ मे.दिपक उत्तराधी,अमरावती यांचे दर ४३४.७७/- प्रती महा प्रती सिट प्राप्त दर सर्वात कमीचे आलेले आहेत. सदरचे दर जास्तीचे वाटत असल्याने निविदा धारक यांना दराच्या वाटाघाटीसाठी बोलविण्यात आले असता त्यांचे प्रतिनीधी श्री.राहुल सुरेश पवार हे उपस्थित होते.

सदरचे दर हे अंदाजपत्रकापेक्षा अधिक असल्याने सदर काम हे अंदाजपत्रकीय दराने करण्याबाबत निविदाकाराशी चर्चा करण्यात आली असता निविदाकाराने अंदाजपत्रकीय दराने काम करणे शक्य होत नाही निविदेप्रमाणे ४१ केअरटेकर लावणे बंधनकारक असून त्यांना किमान वेतन प्रमाणे वेतन अदा करावे लागणार आहे. त्यामुळे त्यांचे निविदेतील दर बरोबर आहे. परंतु निविदा समितीने केलेल्या चर्चेनुसार निविदाधारक यांनी त्यांचेकडील आ.क्र./आ.वि./३०९०/२०२०-२१ दि.१६/०२/२०२१ रोजीच्या पत्रान्वये लेखी स्वरुपात प्रती सिट प्रती महा रु.३७३/- या दराने काम करण्यास तयार असल्याचे कळविले आहे. सदरचा दर हा निविदा दरापेक्षा ५% अधिक आहे. याबाबत सदयस्थितीतील वाढलेले किमान वेतनाचे वाढीव दर विचारात घेता रु.३७३/- हे दर संयुक्तिक वाटत असल्याने जळगांव शहरातील सार्व.शौचालयाच्या १६५५ सिट्सच्या दैनंदिन साफसफाई कामी रु.३७३/- प्रती सिट प्रती महा याप्रमाणे एकुण १६५५ सिट्स करीता ३ वर्ष (३६ महिने) कालावधीसाठी येणारा एकुण रक्कम रु.२,२२,२३,३४०/- मात्रचा खर्च मनपा फंडातून करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने सदर प्रकरणी नियमानुसार शासन निर्णय / आदेशा नुसार आवश्यक त्या सर्व बाबींची पुर्तता करुन कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकुल मते :- १३** **प्रतिकुल मते :- ००**

**सुचक :- दारकुंडे नवनाथ विश्वनाथ**

**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव :- विषय क्र.** ४:- महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ७३(ड) नुसार मा.आयुक्त यांनी केलेल्या संविदांची माहिति घेणे.

**श्री.कुलभुषण पाटील :-** माझ्या माहितीनुसार याच्यामध्ये संविदा क्र.२ जी आहे. ती स्थायी समिती सभा ठराव क्र.३०३ च्या अगोदर मंजुर झालेली आहे. ती आपल्याकडे परत चुकुन आलेली आहे. परंतु ती संविदा मंजुर झालेली आहे आणि आपल्याकडे चुकुन आलेली आहे असे समजुन, साहेब ज्या वेळेला आपल्याकडे एस.के.कॉन्ट्रॅक्टरचे देयकांच्या बाबतीमध्ये सभापती साहेबांनी याच्या अगोदरची स्थायी समितीची सभा घेतली होती. त्यावेळेस संविदा म्हणुन आपली जी चर्चा झाली होती. तेव्हा मी तुम्हाला सांगितले होते की, एका आर्थिक वर्षात आयुक्तांच्या अधिकारात समकक्ष बदलतो महानगरपलिकेच्या फंडातील ह्या संविदा आपण स्थायी समिती समोर मंजुर करु शकतो. किंवा आपण माहितीस्तव पाठवु शकतो. तर माझ्या मते साहेब या ज्या संविदा आहे ह्या जर रु.३४ लाखाची वगळली तर त्या बहुतेक २५ लाखाच्या वर जात आहे. आणि आपण छपाईचा आणि सॉफ्टवेअरचा खर्च करणार आहे . त्याचे लेखाशिर्ष, सामान्य प्रशासन आणि संबंधीत लेखा शिर्ष अधिकारी साहेब , माझ्या माहितीनुसार आपण ते महानगरपालिका फंडातुनच ते पैसे देत असतो.

**श्री.संतोष वाहुळे, उपायुक्त :-** कोणतीही निविदा प्रसिध्द करत असतांना ती जर २५ लाखाच्या आत असेल, तर ते इंडीव्हीजीवल तो आयुक्त साहेबांच्या मान्यतेचा विषय आहे. पण जर कोणतीही निविदा २५ लाखाच्या वर झाली ५० लाखापर्यंत तर त्याचा अधिकार हे स्थायी समिती सभागृहाचा आहे.

**श्री.कुलभुषण पाटील :-** म्हणजे ही पुर्ण निविदा २५ लाखाची असली पाहिजे असे काही आहे.

**श्री.संतोष वाहुळे, उपायुक्त :-** इंडीव्हीजीवल निविदा जर कोणतीही २५ लाखाच्या आत असेल, ते एकच अमाऊंट सर्व संविदा करुन आपण असे धरत नाही.त्या २५ लाखाच्या आत जर एक निविदा असेल तर ती कन्सीडर केली जाईल.

**श्री.कुलभुषण पाटील :-** अशा २५ लाखांच्या कितीही संविदा आयुक्त महोदय मंजुर करू शकतात ?

**श्री.संतोष वाहुळे, मुलेप:-** हो करू शकतात.

**श्री.कुलभुषण पाटील :-** मग त्यासाठी टेंडर काढायची गरज काय आहे आपल्याला, जर समजा आपण २५ लाखाच्या संविदा मंजुर करतात.त्याचे टेंडर काढायची गरज काय आहे. ठीक आहे मी आपला आभारी आहे. पण समजा कुठल्याही कामांच्या बाबतीत जी टेंडर प्रोसेस असतील किंवा वर्कऑर्डर असतील . सिव्हिल संदर्भाच्या असो किंवा आरोग्याच्या संदर्भाच्या असो असे संविदा टेंडर प्रोसेस नंतर कार्यादेश देण्यासाठी आपण स्थायी समिती समोर आणतो. बरोबर आहे एकतर तुम्ही कार्यादेश देवुन टाकलेले असतात.मग तुम्ही कार्यादेश देण्यासाठी स्थायी समिती समोर का आणतात.

**श्री.संतोष वाहुळे, मुलेप:-** मुळात कसं आहे की त्याला मा.आयुक्तांनी मान्यता दिलेली आहे त्याची माहिती सभागृहाला द्यायची असते. ५ लाखांच्या वरच्या ज्या संविदा असतात त्याची माहिती सभागृहाला अवगत करून द्यायची असते.

**श्री.नितीन लढ्ढा :-** सभापती महोदय, आम्ही टि.बी .हॉस्पीटल येथे भेट दिली होती गणपती विसर्जनाच्या आदल्या दिवशी आणि तेथे महानगरपालिकेच्या मालकीचे कॉम्पॅक्टर तर ते दुरूस्ती करण्याच्या संदर्भात आपण स्वत: आदेश दिले होते. त्यानंतर स्थायी समितीच्या अनेक सभांमध्ये त्या विषयावर चर्चा झाली आणि प्रत्येक वेळेला त्यापध्दतीने आश्वासन दिलं गेलं की ते दोन दिवसांत पाठवले जातील आठ दिवसांत पाठवले जातील. आज कोट्यावधी रूपयाची लागत असलेली ती मशिनरी आहे. आज अक्षरश: ती भंगार भावामध्ये विकली जाईल अशा परिस्थितीमध्ये ती येवुन पडलेली आहे. सहा महिन्यापुर्वी आपण स्वत: व्हिजीट केली होती. परंतू ती वाहने अद्यापपर्यंत तशाच परिस्थिती मध्ये पडलेली आहे त्याच्या मध्ये कुठलीही प्रगती शुन्य आहे. काय कारण आहे नेमकं असं, कोट्यावधी रूपयांच्या मालमत्ता आहे त्या महापालिकेच्या कमीत कमी त्या मक्तेदाराला दिल्या तर त्या सुस्थितीत राहतील आणि सुस्थितीत परत मिळतील आणि त्या करारनाम्यातील अटी शर्तींचाही भंग होणार नाही. ही वाहनं आपल्याकडुन मक्तेदाराला देणं अपेक्षित होतं.उद्या पुन्हा अशा पध्दतीचे तांत्रिक मुद्दे निघुन त्याच्यावर वादविवाद कायदेशीर निर्माण होतील आणि आपण दिलेल्या आदेशाच अद्यापपोवेतो पालन होत नसेल सहा सहा महिने तर नेमकं चाललंय काय.

**श्री.गोपाळ लुले , वाहन विभाग प्रमुख:-** आपल्या ५ कॉम्पॅक्टर पैकी दोन कॉम्पॅक्टरची वर्कऑर्डर पुण्याच्या ठेकेदाराला दिलेली होती. तर ती मागच्य वर्षी ०६/०१/२०२० ला दिली गेली होती. तर ते कॉन्ट्रॅक्टर एक दिड महिन्यापुर्वी आलेले होते. तेव्हा त्यांना आम्ही सांगीतले होते की तुम्ही आम्हाला एक पत्र द्या की आम्ही ही वाहने घेवुन जायला तयार आहेत दुरूस्ती करण्यासाठी तर त्यांनी तसे काही लेखी दिले नाही . तर वर्कऑर्डरची मुदत संपुन गेलेली होती. दोन कार्यादेश दिलेले होते त्यापैकी एकच कार्यादेश त्यांनी घेतलेला आहे आणि एक घेतलेलाच नाहीये.

**श्री.नितीन लढ्ढा :-** मग या संदर्भात काही आपल्याकडुन निदर्शनास आणलं गेले आहे का आपण या सभागृहात ज्यावेळी या विषयावर चर्चा करतो त्यावेळेला हे उत्तर मिळत . वास्तविक ही जबाबदारी कुणाची आहे. ही काही सभागृहाच्या सदस्यांची जबाबदारी नाहीये. या प्रशासकीय बाब ज्या आहेत या आपण निदर्शनास आणुन देणं व ही आमची जबाबदारी नाहीये. तरीसुध्दा महानगरपालिकेच्या अश्या अनेक मालमत्ता आहेत की ज्यांच्याकडे दुर्लक्ष होवुन कोट्यावधी रूपयांच्या मालमत्ता मग त्या इमारती असती. याच्यामध्ये ज्यापध्दतीने वाहनांच्या संदर्भात बोललेलो आहे.त्याच पध्दतीने हुडकोच्या मेहरूणच्या जमीनीच्या संदर्भात बोललेलो आहे.कमीत कमी दहा वेळा सभागृहात चर्चा झालेल्या आहेत. कोट्यावधी रूपयांचा भुसंपादनाचा मोबदला वाढीव मोबदला चार वर्षापुर्वी जवळपास चार कोटी रूपये दिला आणि ती जमीन मालक ती जमीन त्याच्या ताब्यात ठेवुन तो तिथे व्यवसाय करतोय.या पध्दतीच्या सभागृहात आम्ही ज्यावेळेला चर्चा करतो त्या मंडळींची व्यक्तीगत नाराजी आमच्याशी होतेय की महापालिकेला काही घेणंदेण नाहीये मग सदस्यांना काय घेणंदेणं

आहे.आमच्या पक्षातील जवळची मंडळी आहे ती तरी सुध्दा आपण म्हणतो की महानगरपालिका त्या कोट्यावधी रूपयांचा त्या जागेचा मोबदला चुकवतेय आणि महानगरपालिकेला ती जागा ताब्यात घेण्याची शुध्द सुध्दा नसते . कालांतराने अशा ठिकाणी अतिक्रमण वाढत मग त्या ताब्यात घेण्यासंदर्भात कोर्ट कचेऱ्यामध्ये लाखो रूपये खर्च होतात. परंतु भुसंपादनाचा मोबदला दिल्यानंतर प्रशासनाची जबाबदारी नाहीये का? की आपली जागा मोजुन आपल्या ताब्यात घेणे. अनेक वेळा चर्चा झाली या सभागृहात ती जागा ताब्यात घेण्याच्या संदर्भात तिथं जावुन बघा आपण तो त्याठिकाणी खाजगी जागेसारखा त्या ठिकाणी म्हशी बांधुन ठेवलेल्या आहेत, चारा भरून ठेवलेला आहे. मग आपण अशा कोट्यावधी रूपयांच्या मालमत्तांच संरक्षण करू शकत नसाल तर मला सांगा कसकाय चालणार आहे.एकीकडे आपण आर्थिक चणचणीला सामोरे जात असतो आणि एक ठिकाणी कोट्यावधी रूपयांच्या मालमत्ता, मी त्या ट्रान्सपोर्ट नगरच्या बाबतीत ज्यावेळेला पदाधिकारी म्हणुन होतो आम्ही व्यक्तीगत तिथं वाईटपणा घेवुन कोर्टाकडुन निकाल सुध्दा मिळवुन आणले परंतू प्रशासनाकडुन उच्च न्यायालयात कॅव्हेट सुध्दा दाखल करता आले नाही. उच्च न्यायालयामध्ये त्याला स्टेटस्को मिळालेला आहे.परंतू तो स्टेटस्को व्हॅकेंट करण्याच्या संदर्भातही आज साडे चार एकर जागा आहे शहराच्या मध्यवर्ती भागातील कोट्यावधी रूपये किमतीची जागा आहे.पण मग कोणाला काही घेणदेणंच नाहीये. अशा कोट्यावधी रूपये किमतीच्या जागा लोकं नाममात्र रूपयांमध्ये जर ताब्यात ठेवत असतील आणि प्रशासनाकडुन त्याच्यासंदर्भा मध्ये हालचाली होत नसतील. तर मला नाही वाटतं की आपण या महानगरपालिकेची आर्थिक परिस्थिती सुधारण्याचे स्वप्न पाहतो ते कदाचित स्वप्न म्हणुनच राहुन जाईल.

**मा.आयुक्त :-** काही कारणामुळे तो ठेकेदार काम करतं नसेल तर तुम्ही त्याच्यावर त्याला दिलेली वर्कऑर्डर किंवा नविन वर्कऑर्डर किंवा  नविन टेंडर काढणे व ते काम करून घेवुन व ते हॅंडओवर करणं त्याला स्थायीची मान्यता घेवुन करणे आपण त्याला वर्कऑर्डर दिली व त्याने ती स्विकारली नाही आणि त्याने काम केलं नाही एवढ्यावर थांबुन उपयोग नाही आणि सन्मा सदस्य म्हणताहेत त्या प्रमाणे वाहन विभागासंदर्भात या बाबी वाहन विभागाच्या स्तरावरच राहतात . तुम्ही ऑडीटरांचा सल्ला घेतला पाहीजे की काय केले पाहीजे किंवा आयुक्तांना दिले पाहीजे किंवा उपायुक्तांना दिले पाहीजे. वाहने जी आहे आज ती कोट्यावधी रूपयांची वाहनं पडुन राहुन त्याचे डिप्रेशिएशन कमी होतं म्हणुन ही वाहनं तातडीने उपयोगात आणणं गरजेचं आहे. जर समजा एखादी टेंडरची प्रक्रीया केली गेली तर तुम्ही तिथचं थांबुन उपयोग नाही. त्याचा पुढचा टप्पा केला पाहीजे ते कॅन्सल करून पुन्हा टेंडर काढले पाहीजे. जी वाहनं दुरूस्त करावयाची आहेत ती दुरूस्त करून घेतली पाहीजेत आणि ते पडुन राहीलं महापालिकेचे नुकसान होते आणि यासाठी आपले जे वाहन विभाग प्रमुख होते आपण त्यांच्यावर कारवाई प्रस्तावित केली आपण त्याला ती सुरू केली आणि त्याची बदलीही केली. परंतू अधिकारी बदलुनही कामामध्ये जर बदल होणार नसेल तर मग बरोबर नाही.

**मा.सभापती:-** मला वाटतं तिथे आपले पोकलॅंड मशिन सुध्दा पडलेले आहे. त्याला काय प्रॉब्लेम आहे.

**श्री.गोपाळ लुले , वाहन विभाग प्रमुख:-** त्याला आपल्याला जर प्रॉपर दुरूस्ती करणाऱ्याला दाखवावे लागेल आणि त्याला वेळ लागतो.

**मा.आयुक्त :-** जर दुरूस्त होत असेल तर वाहन विभागाला अडचण काय आहे.

**मा.सभापती:-** करोडो रूपयांची आपली ती मशिनरी पडुन आहे थोडया कामासाठी तर रिपेअर झाले तर आता जसे आपल्या जेसीबीचा विषय आहे. आपले नगरसेवक जेसीबी मागतात एकमेव जेसीबी आपल्याकडे आहे. पाणी पुरवठ्यासाठी तेच , आरोग्यासाठी तेचं मग नागरीकांच्या समस्या कधी सुटतील.

**श्री.गोपाळ लुले , वाहन विभाग प्रमुख:-** आपल्याकडे पाणी पुरवठा विभागाकडे एक व बांधकाम विभागाकडे एक जेसीबी आहे.

**मा.सभापती:-** जेव्हा मी सोनगिरे साहेब आहेत का येथे  सोनगिरे साहेबांना मी चार दिवसांपुर्वी फोन केला होता तर आपल्याकडे एकच जेसीबी उपलब्ध आहे असं सांगीतले. तुम्ही म्हणताहेत की दोन आहेत.

**श्री.गोपाळ लुले , वाहन विभाग प्रमुख:-** त्यांनी बांधकाम विभागाचे सांगीतले असेल की बांधकाम विभागाकडे एकच जेसीबी आहे.

**मा.सभापती:-** पाणीपुरवठ्या कडे आणि बांधकामाकडे एक असेल काहीतरी प्रॉब्लेम असतो ना दोन जेसीबी सुरू आहेत का?

**श्री.गोपाळ लुले , वाहन विभाग प्रमुख:-** हो बांधकाम आणि पाणी पुरवठाकडे आहे.

**श्री.पवन पाटील , सहा.आयुक्त :-** पाणी पुरवठ्याच एक चालु आहे आणि बांधकामचे एक चालु आहे आणि आरोग्याचे जे जेसीबी आहे ते रॅम्पवर चालु आहे आपण त्याच्यावर कंपोस्टींग चे जे काम आहे ते करून घेतोय. आरोग्याच्या दृष्टीने आणि आपण त्याचे टायरसुध्दा चेंज करून घेतले आहे.

**मा.आयुक्त :-** आता जी वाहने आहेत दुरूस्ती करण्यायोग्य असतील तर ती तात्काळ दुरूस्ती करण्यात यावी. पोकलँड असेल, कॉम्पॅक्टर असतील व इतर जी वाहने असतील जी दुरूस्ती करण्यासारखी आहेत. ज्याचे दूरस्ती होत नसेल त्यांची आपण स्क्रॅप मध्ये टाकावे लागतील.

**श्री.पवन पाटील , सहा.आयुक्त :-** सर पोकलँडचा विषय झालेला आहे ते दुरूस्तीसाठी दहा ते बारा लाखापर्यंत खर्च येवु शकतो असा अंदाजित खर्च अपेक्षित आहे.

**मा.आयुक्त :-** आता दुसरा विषय असा होता की मनपाच्या मालमत्तांकडे दुर्लक्ष होतेय ही वस्तुस्थिती आहे की मालमत्ताचे व्यवस्थापन आपल्याकडुन केले जात नाही. कोट्यावधी रूपयांच्या जागा आहेत . इमारती आहेत किंवा इतर काही आपल्या मालमत्ता आहेत. यासाठीच मी बजेटच्या वेळेला म्हंटलो होतो की एक विभाग उपायुक्तांच्या देखरेखी खाली मालमत्ता व्यवस्थापन विभाग करू आणि त्यात महानगरपालिकेच्या सगळया जागा या ताब्यात घेतल्यानंतर कार्यालयीन प्रक्रीया ते करतील व ते ताब्यात घेतल्यानंतर पुढील कार्यवाही मालमत्ता व्यवस्थापन विभागाकडुन होईल आणि यासाठी पुरेसा वेळ मिळावा म्हणुनच या विभागाचे जे उपायुक्त आहेत. त्यांचे कार्यभार इतर उपायुक्तांकडे शिफ्ट केलेले आहेत.कारण त्यांना या एकाच विषयावर लक्ष केंद्रीत करता यावं. यापुर्वी ज्या ज्या जागा अशा दुर्लक्षित झाल्या असतील. तर आपण या विभागामार्फत जी कार्यवाही करावी लागेल ती आपण करू.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** अध्यक्ष महोदय , आता जे फायरचे बंब आलेले आहेत नविन आता बुधवारी फायरच्या गाड्यांच्या काचा फुटल्या उन्हामुळे आता मी मागे पत्र दिले होते की तिथे फायरच्या गाडया लावायला शेड पाहीजे वगैरे वगैरे मी पुर्ण माहिती घेतली होती. आता ही तिसरी मिटींग आहे आपली तर या चालु गाडयांचे हे हाल झालेले आहेत तर जुन्या गाडयांचा विषय काय होईल.

**श्री.शशिकांत बारी, अग्निशमन अधिकारी :-** मा.सभागृह मी तिथे पाहणी केली असता रस्त्यांमुळे त्या गाडयांचे काच फुटले होते , आपले समता नगर जे आहे त्या भागात वनवा पेटलेला होता . रस्त्यांने जातांना अचानक ती काच फुटलेली आहे.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** शेड आहे का तिथं तुमचं मी पत्र दिलेलं होत , वारंटी आहे का त्याची साहेबांनी सांगीतलं होत की तुम्ही पत्र पाठवा.

**श्री.गोपाळ लुले, वाहन विभाग प्रमुख :-** आपण मक्तेदाराला कळविलेले आहे.

**मा.आयुक्त :-** वारंटी पिरीएड मध्ये असेल तर ते बदलवुन मिळेल ना आपल्याला

**श्री.गोपाळ लुले, वाहन विभाग प्रमुख :-** चार वाहनांपैकी एकाच वाहनाचा तो उजव्या साईडचा काच फुटलेला आहे . एखाद्यावेळेस कदाचित त्याच्यामध्ये प्रॉडक्शन टेक्निकल फॉल्ट असु शकतो . तो उन्हा मुळे फुटला की कशामुळे फुटला हे सांगता येत नाही. तरी आपण मक्तेदाराला कळविलेले आहे.

**मा.सभापती:-** मॅन्युफॅक्चरींग जर फॉल्ट असेल तर ती त्यांची जबाबदारी आहे बदलवुन द्यायची .

**श्री.गोपाळ लुले, वाहन विभाग प्रमुख :-** तो काचेपुरता असु शकतो तो .

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** अहो साहेब तुम्हाला तिन वर्षापासुन सांगीतले आहे की शिवाजी नगरचे तिन ट्रॅक्टर बंद आहे. त्याचे काय आहे ते सांगा ना साहेबांना , साहेब वर्कऑर्डर दिल्यावर सुध्दा तुम्हाला बॅटरी पुरवत नाहीये. धक्का मारावा लागतोय कर्मचाऱ्यांना एक एक दोन दोन तास ट्रॅक्टर पडलेले राहते.नविन आहे ते ट्रॅक्टर बॅटरी पुरवत नाहीयेत .

**मा.सभापती:-** आज बॅटरी मिळुन जाईल .

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** तिन महिने झाले या गोष्टीला ही अशी परिस्थिती आहे वाहन विभागाची

**मा.आयुक्त :-** गोसावी साहेब आहेत आपले हा विभाग त्यांच्याकडे दिलेला आहे.तसेच सहा.आयुक्त जे आहेत वाहन विभागाचे त्यांनी याच्यात लक्ष घातलं पाहीजे . छोट्या छोट्या गोष्टींची चर्चा करणं मला वाटतं यापुढे अशी वेळ येणार नाही.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** आयुक्त साहेब दुसरा विषय असा आहे की आता तुम्ही आले असतील शिवाजी नगरमधुन रस्ता खुप चांगला आहे. आता परवाच्या पेपरला आले होते की पुर्ण ट्रॅफीक जाम होती नाल्यापासुन ते तुमच्या बंगल्यापर्यंत लोकं तिथ रसत्यावर बसलेले होते. मी मागील सहा महिन्यापासुन सांगतोय तो रोडाचा पॅसेच मला तो करून मिळावा म्हणुन केला नाही साहेब अजुन फक्त डबरी पी करून सोडुन दिला आहे. साहेब तुम्ही रोज वापरता तेथुन आज तुम्ही आज पुर्ण ट्रॅफीक बंद आहे.उठत नाहीये ते लोकं आजची परिस्थिती पाहा तुम्ही नाल्यापासुन पुर्ण सुरेशदादा यांच्या बंगल्यापर्यंत

**मा.आयुक्त :-** माझ्या माहिती प्रमाणे ते

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** शिवाजी नगरचा क्रांती चौक ते कानळदा रोड पर्यंत तो रस्ता सांगीतला मी

**श्री.नितीन लढ्ढा :-** सभापती महोदय, मला वाटत की कोणत्या प्रतीच्या मजबुती मध्ये कोणते रस्ते मंजुर झालेले आहेत ते केव्हा पर्यंत होतील. होतील की नाही होतील .७५ कोटींमध्ये हे रस्ते ६२ कोटींमध्ये ते रस्ते , ४२ कोटींमध्ये ते रस्ते शासनाकडुन मंजुर होवुन येणारे येण्याची शक्यता असलेले आपले ते रस्ते , न शक्यता असलेले हे रस्ते, डिपीडिसी मधुन झालेले हे कमीत कमी ते बोर्ड वाचुन हे म्हणतील की ठिक आहे. एवढे तरी आमच्या निदर्शनास आणुन दिले हे काम महापालिकेने केलेले आहे. आता आपल्या अधिकाऱ्यांना जरी विचारले ना तर तो म्हणतो बघुन सांगावे लागेल आणि त्याचा अभ्यास करावा लागेल की कोणत्या ७५ कोटी मध्ये आहे की ६२ कोटी मध्ये आहे , ४२ कोटी मध्ये आहे की २५ कोटी मध्ये आहे. एक दिवस त्याच्यसाठी जातो त्याची माहिती उपलब्ध करून देण्याच्या संदर्भात आणि आपण ते म्हणतात की सन्मा.सदस्य ही वस्तुस्थिती ती मांडताहेत . परंतू आपण सांगीतले की ४२ कोटी मध्ये आहे की ४० कोटी मध्ये आहे, की २५ कोटी मध्ये आहे . परंतू या उत्तराने सदस्यांच समाधान होईल . ना त्या भागातील नागरीकांचे समाधान होईल.

**श्री. कुलभुषण पाटील** :- प्रस्ताव मान्य आहे.

**श्री.मुकुंदा सोनवणे** :- माझे अनुमोदन आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र. ३२४ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ७३(ड) नुसार मा.आयुक्त यांनी केलेल्या संविदांची माहिती घेतली.

१. प्रशासकीय आदेश क्र./१७४ दि.१५/०१/२०२१ अन्वये विविध विभागांना लागणारी सर्व प्रकारची ऑफीस स्टेशनरी पुरवठा करणेकामी बाबनिहाय एल-१ मक्तेदार यांचे दर स्विकारुन एकूण रक्कम रु.१२,५५,२७९/- मात्र खर्चाची संविदा.
२. प्रशासकीय आदेश क्र./१७५ दि.१५/०१/२०२१ अन्वये विविध विभागांना लागणारी सर्व प्रकारची ऑफीस छपाई पुरवठा करणेकामी बाबनिहाय एल-१ मक्तेदार यांचे दर स्विकारुन एकूण रक्कम रु.३८,४१,७२८/- मात्र खर्चाची संविदा.
३. प्रशासकीय आदेश क्र./१८१ दि.२९/०१/२०२१ अन्वये विविध विभागातील टोनर रिफीलींग, संगणक व प्रिंटरच्या दुरुस्तीसाठी लागणारे साहित्य पुरवठा करणेकामी बाबनिहाय एल-१ मक्तेदार यांचे दर स्विकारुन एकूण रक्कम रु.८,००,०००/- मात्र खर्चाची संविदा.
४. प्रशासकीय आदेश क्र./१८३ दि.०२/०२/२०२१ अन्वये दरमहा वेतन पत्रक बनविणेकामी ०३ वर्षाकरीता संगणकीय आज्ञावली (Software) व सेवा (Services) पुरवठा करणेकामी मक्तेदार Intellect Technosoft, Jalgaon यांचे सर्वात कमीचे दर स्विकारुन एकूण रक्कम रु.५,८५,७८०/- मात्र खर्चाची संविदा.

वरील चार संविदांची माहीती घेतली मात्र संविदां क्र.२ ही भांडारविभागाकडून नजरचूकीने पाठविली गेलेली आहे. यापूढे याबाबत दक्षता घ्यावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकुल मते :- १३** **प्रतिकुल मते :- ००**

**सुचक :- पाटील कुलभुषण विरभान**

**अनुमोदक :- सोनवणे मुकूंदा भागवत**

**मा.सभापती:-** सभा संपलेली असल्याने नगरसचिव यांनी राष्ट्रगीत सुरु करावे.

**नगरसचिव :-** सर्व सन्मा.सदस्यांना विनंती करतो की सर्वांनी राष्ट्रगीत साठी उभे राहायचे आहे.

राष्ट्रगीत झाल्यानंतर सभा संपन्न झाली.

**सही/-**

**सभापती**

**जळगांव शहर महानगरपालिका, जळगांव**